# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.03.2026** **वारःशनिवार**

---

1. शेती हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा-पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. या महिन्याच्या अखेरीस देश नक्षलवादापासून मुक्त होईल-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला विश्वास
3. महाराष्ट्राचा 2026-27 चा अर्थसंकल्प राज्याच्या विधानसभेत सादर-शेतकऱ्यांसाठी 2 लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा आणि
4. ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये लक्ष्य सेनचा पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**<u>पंतप्रधान-वेबिनार</u>**

शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून, देशाच्या दीर्घकालीन विकास प्रवासासाठी एक धोरणात्मक आधारस्तंभ आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कृषि आणि ग्रामीण परिवर्तन या विषयावर काल आयोजित करण्यात आलेल्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबोधित करत होते. या वर्षीचा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण परिवर्तनाला पोषक आहे असं सांगत, देशात सध्या अन्नधान्य, डाळी आणि तेलबियांचं विक्रमी उत्पादन होत असल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकार शेतीमध्ये तंत्रज्ञान आणण्यावर भर देत असल्याचं पंतप्रधान पुढं म्हणाले.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आहेत. या भेटीदरम्यान, आंतरराष्ट्रीय संथाल मंडळानं आयोजित केलेल्या 9 व्या आंतरराष्ट्रीय संथाल परिषदेला राष्ट्रपती उपस्थित राहतील.

**<u>अमित शहा</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल ओडिशामध्ये 3 हजार 770 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ, ओडिशा राज्य सहकारी दूध उत्पादक महासंघ तसंच राज्य सरकारच्या विविध प्रकल्पांचा समावेश आहे. शाह यांनी इफ्को अर्थात इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेडच्या पारादीप युनिटमध्ये सल्फ्यूरिक ॲसिड प्लांट-3 चं उद्घाटन केलं. गृहमंत्र्यांनी भुवनेश्वरमध्ये एका सहकारी विकास चर्चासत्रालाही संबोधित केलं. यावेळी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी उपस्थित होते. हा सल्फ्यूरिक ॲसिड प्लांट देशांतर्गत उत्पादन वाढवेल तसंच देशाला रसायनात स्वयंपूर्ण बनवण्यास मदत करेल असं यावेळी बोलताना शाह म्हणाले. अंतर्गत सुरक्षेचा संदर्भ देताना, केंद्रानं डाव्या विचारसरणीच्या अतिरेकी कारवायांना दूर करण्यासाठी प्रयत्न तीव्र केले असल्याचं त्यांनी सांगितलं. या महिन्याच्या अखेरीस देश नक्षलवादापासून मुक्त होईल असा विश्वास व्यक्त करून नक्षलवादानं प्रभावित झालेल्या प्रदेशांमध्ये विकासाला गती देण्यासाठी आणि आदिवासी समुदायांना विकास उपक्रमांचा फायदा मिळावा यासाठी सरकार काम करत असल्यांचं ते म्हणाले.

**<u>महाराष्ट्र-अर्थसंकल्प</u>**

विकसित महाराष्ट्राचा 2026-27 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सादर केला. 7 लाख 69 हजार 467 कोटी रुपयांच्या या अर्थसंकल्पात 6 लाख 16 हजार 99 कोटी रुपये महसुली जमा आणि 6 लाख 56 हजार 651 कोटी रुपयांचा महसुली खर्च अंदाजित आहे. त्यामुळं 40 हजार 552 कोटी रुपयांच्या अंदाजित तुटीचा हा अर्थसंकल्प असून राजकोषिय तूट स्थुल उत्पन्नाच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश आलं

आहे. 2030 पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था, 1 ट्रिलियन डॉलर्सची आणि, 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची करण्याचं उद्दिष्ट असल्याचं फडणवीस म्हणाले. अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत 30 सप्टेंबर 2025 रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी तसंच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून 50 हजार रुपयांचं अनुदान देण्यात येणार आहे.

**लोकसेवा आयोग**

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा-2025 मध्ये देशातील एकंदर 958 उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात महाराष्ट्रातील 60 हून अधिक उमदेवारांचा समावेश आहे. अधिकृत निकाल आणि यशस्वी उमदेवारांची नावं केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**नितिन गडकरी**

भारताला ऊर्जेच्या क्षेत्रात आत्मनिर्भर बनवण्यासाठी बायोगॅस हा सर्वोत्तम पर्याय आहे, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. यशदा इथं आयोजित 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस कॉन्क्लेव्हचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. इंडियन फेडरेशन ऑफ ग्रीन एनर्जीचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, खासदार डॉ. टी. कृष्णाप्रसाद यावेळी उपस्थित होते.

**लोकसभा**

लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांना हटवण्याबाबतीत सोमवारी चर्चा होणार आहे. पक्षपाती कामकाजाचा आरोप करत विरोधी पक्षांनी त्यांच्याविरोधात अविश्वास ठरावाची नोटीस दिली आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेचा पहिला टप्पा गेल्या महिन्यात झाला. यादरम्यान विरोधी पक्षांनी ही नोटीस दिली. यावर कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, डीएमकेसह अन्य पक्षांच्या 118 खासदारांनी स्वाक्षरी केली आहे. दरम्यान, केंद्रीय अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा टप्पा नऊ मार्चपासून सुरू होणार आहे. कॉंग्रेस आणि भाजपनं आपल्या सदस्यांना नऊ आणि दहा मार्च रोजी सभागृहात हजर राहण्यासाठी व्हिप जारी केला आहे.

**पाणी-बिर्ला**

पाणी बचत ही काळाची गरज असून, मानवजातीचं भविष्य सुरक्षित करण्यासाठी लोकप्रतिनिधींसह सर्वांनी मिळून पाणी बचतीसाठी काम केलं पाहिजे, असं मत लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल नवी दिल्लीत जागतिक पाणी परिषदेत व्यक्त केलं. जागतिक पातळीवर पाण्याशी संबंधित विविध आव्हानांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पाणी फोरमसारख्या संस्था महत्त्वाचं काम करत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. शाश्वत विकास आणि जागतिक सहकार्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

**वृत्त वाहिन्यां-TRP**

केंद्र सरकारनं ब्रॉडकास्ट ऑडियन्स रिसर्च कौन्सिल ला वृत्त वाहिन्यांसाठी टीआरपी अर्थात टेलिव्हिजन रेटिंग पॉइंट्सचं वृत्तांकन चार आठवड्यांसाठी तत्काळ स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत. इस्रायल-इराणमध्ये सुरू असलेल्या संघर्षादरम्यान काही दूरचित्रवाणी वृत्तवाहिन्या अनावश्यक सनसनाटी वृत्त प्रदर्शित करत असून यामुळं सामान्य लोकांमध्ये, विशेषतः प्रभावित भागातील नागरिकांमध्ये भीती निर्माण होऊ शकते, असं सूचना आणि प्रसारण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**विमान-उड्डाणे**

पश्चिम आशियातील वर्तमान घडामोडी आणि त्यामुळं हवाई क्षेत्रावरील निर्बंधांमुळं काल भारतीय देशांतर्गत विमान कंपन्यांची 278 विमानउड्डाणे रद्द करण्यात आली. नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं 5 मार्चच्या आकडेवारीवर आधारित दिलेल्या माहितीनुसार देशात येणाऱ्या विमानांपैकी भारतीय विमान कंपन्यांनी चालवलेली एकंदर 40 विमानं पश्चिम आशियातून भारतात आली असून यात 7 हजार 200 हून अधिक प्रवासी होते. पश्चिम आशियातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या आतापर्यन्त एकंदर 14 हजार 900 हून अधिक झाली आहे. या कालावधीत प्रवाशांना वेळेवर मदत मिळावी यासाठी विमान कंपन्या आणि इतर संबंधित यंत्रणा यांच्यात समन्वय साधत, एक समर्पित प्रवासी सहाय्य नियंत्रण कक्ष 24 तास कार्यरत आहे. एअरसेवा,

समाज माध्यम आणि हेल्पलाइन कॉलद्वारे आतापर्यंत एक हजार आठशेहून अधिक प्रवाशांच्या तक्रारींचं निराकरण करण्यात आलं असून प्रवाशांना नवीन विमान उड्डाणांवर तसंच संबंधित विमान कंपन्यांकडून मिळणाऱ्या सूचनांवर बारकाईनं लक्ष ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**शिवजयंती**

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती महाराष्ट्रात काल ठिकठिकाणी साजरी करण्यात आली. राज्यात शिवजयंतीनिमित्त मिरवणुका आणि अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**फळनिर्यात फटका-नवी मुंबई**

आखाती देशांत सध्या सुरू असलेल्या युद्धाचा मोठा फटका फळांच्या निर्यातीला बसला आहे. जेबेलअली आणि चाबहार बंदर बंद करण्यात आल्यामुळं द्राक्ष, कांदा, केळी या पिकांची निर्यात ठप्प झाली असल्याचं अपेडा मुंबईचे उपमहाव्यवस्थापक नागपाल लोहकरे यांनी सांगितलं.

**बॅडमिंटन**

बर्मिंगहॅम इथं सुरु असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये जागतिक क्रमवारीत 12 व्या स्थानावर असलेल्या लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपउपांत्य फेरीत त्यानं चीनच्या ली शी फेंगचा 21-13, 21-16 असा पराभव केला. त्याचा पुढील सामना कॅनडाच्या व्हिक्टर लाई आणि जपानच्या कोकी वतानाबे यांच्यातील विजेत्याशी होईल. ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीनं हाँगकाँगच्या तांग चुन मान आणि त्से यिंग सुएतविरुद्ध दुखापतीमुळं निवृत्ती घेतल्यानंतर या स्पर्धेत लक्ष्य सेन हा एकमेव भारतीय खेळाडू राहीला आहे.

**बुद्धिबळ**

जागतिक बुद्धिबळ विजेता डी. गुकेशनं काल चेक प्रजासत्ताकमधील प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवात मास्टर्स विभागाच्या नवव्या आणि शेवटच्या फेरीत स्पेनच्या डेव्हिड अँटोन गुइजारोचा पराभव केला. गुकेश आणि गुइजारो साडेतीन गुणांसह संयुक्तपणे नवव्या स्थानावर राहिले. भारताच्या अरविंद चिथंबरमनं अंतिम फेरीत चेक ग्रँडमास्टर डेव्हिड नवारा याला हरवून 5 गुणांसह संयुक्तपणे दुसरं स्थान पटकावलं. उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हनं 6 गुणांसह विजेतेपद पटकावलं. चॅलेंजर्स विभागात, भारताच्या दिव्या देशमुखनं चेक प्रजासत्ताकचा खेळाडू हबेक स्टेपनचा पराभव करून 5 गुणांसह तिसरं स्थान मिळवलं. चेक प्रजासत्ताकच्या फिनेक व्हॅक्लावनं साडेसहा गुणांसह विजेतेपद जिंकलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.